# लोक महाविद्यालय, वर्धा

## समाजशास्त्र विभाग

## अहवाल सत्र 2016 -17

सत्र 2016-17 या शैक्षणिक वर्षात लोक महाविद्यालय, वर्धा समाजशास्त्र विभागांतर्गत समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापन करण्याकरिता दिनांक 21 सप्टेंबर 2016 या महिन्यामध्ये बैठक संपन्न आली. सदरहु बैठकीला समाजशास्त्र विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. मा.सौ.पुष्पा तायडे प्राचार्या लोक महाविद्यालय वर्धा यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. यात समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु. प्रतिक्षा डूकरे या विद्यार्थीनीची निवड करण्यात आली. सदरहु बैठकीला समाजशास्त्र विभागाचे प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

समाजशास्त्र अभ्यास मंडळाव्दारे समाजाशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा स्वामी विवेकानंद केंद्र, नागपूर येथे नेण्यात आला. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची माहिती समाजशास्त्र विभागातील विद्यार्थीना होण्याच्या दृष्टीने या अभ्यास दौ-यांचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी विवेकानंद केंद्र, नागपूर येथील कार्यक्रम दरम्यान समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी ‘ भावी युवा पिढींमध्ये स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे महत्व’ याविषयावर पथनाटय सादर केले. सदरहु अभ्यास दौ-यामध्ये मा.सौ.पुष्पा तायडे मॅडम, प्राचार्या लोक महाविद्यालय वर्धा आणि समाजशास्त्र विभागाचे प्राध्यापक वर्ग व विद्यार्थीगण सहभागी झाले होते.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन ‘हुंडाबंदी’, ‘स्त्रीभृणहत्या’, ‘पाणी वाचवा’ इत्यादी महत्वाच्या सामाजिक प्रश्नांवर पथनाटय सादर करुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जाणिवजागृती निर्माण केली.

तसेच समाजशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्याचे सेमीनार आयोजीत करण्यात आलेले होते. त्याकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे मॅडम, प्रा.डेहणे मॅडम, प्रा. उमाटे मॅडम व प्रा.पंचभाई मॅडम यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

प्रा.जयश्री डेहणे
समाजशास्त्र विभाग,
लोक महाविद्यालय, वर्धा